I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** भाग्य नगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0356 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/06/2025 20:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 23/06/2025
   **Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/06/2025
   **Time From (वेळेपासून):** 16:27 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:37 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 23/06/2025 **Time (वेळ):** 20:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 050
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/06/2025 20:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** विभागीय राज्य परिवहन, कार्यालय नांदेड येथील ,लोकसेवक यांचे कक्षात

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): गणेश दिगंबर कळसे

(b) **Father's Name** (वडील चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1970

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हडको नांदेड ,नांदेड ,नांदेड ग्रामीण,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हडको नांदेड ,नांदेड ,नांदेड ग्रामीण,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9665444110

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लक्ष्मीकांत विठ्ठलराव गवारे | | वडील का नाम : विठ्ठलराव | 1. नांदेड ,नांदेड ,भाग्य नगर,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची मागणी रक्कमा | 7,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

7,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 23/06/2025

फिर्याद

मी गणेश दिगंबर कळसे, वय 55 वर्ष, व्यवसाय नोकरी, प्रमुख कारागिर ( संधाता ) विभागीय कार्यशाळा, रा.प. नांदेड. रा. एनडी - 42, पी -1, 11-8-154 , हडको, नांदेड, जि.नांदेड येथे सुनिलकुमार वडपर्ते यांचे घरी भाड्याने .मोबाईल क्रमांक - 9665444110, आधार क्रमांक - 2357 8719 6037

समक्ष पोलीस स्टेशन भाग्यनगर नांदेड येथे हजर येवून लेखी फिर्याद लिहून देतो की, मी वरील ठिकाणी नोकरी करुन कुंटूबाचा उदरनिर्वाह करतो. दिनांक 02/05/2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे हजर येवून लेखी तक्रार दिली होती ती खालील प्रमाणे

मी राज्य परिवहन नियमाचा भंग केला आहे असा माझ्यावर आरोप ठेवुन माझी खात्यांर्गत चौकशी झालेली आहे. माझ्याविरुध्दचे चौकशी प्रकरणाची चौंकशी श्री. लक्ष्मीकांत जी.गवारे, कामगार अधिकारी, रा.प. विभागीय कार्यालय नांदेड यांनी केलेली आहे. दरम्यान मार्च 2025 मध्ये त्यांनी मला सांगीतले की, मी तुमच्या विरुध्दच्या प्रकरणाचा चौकशी अहवाल श्री. क. बा. भारती, विभागीय वाहतुक अधिकारी, रा.प. नांदेड यांचेकडे सादर केला असता श्री. भारती साहेबांनी सांगीतले की, तुमच्या बेसीकच्या 10 टक्के रक्कम तुम्हाला शिक्षा म्हणुन करणार आहेत.

मी गवारे साहेबांना शिक्षा कमी करण्याची विनंती केली असता त्यांनी सांगीतले की, मी भारती साहेबांना बोलून तुम्हाला फक्त 500/- रुपये दंडाची शिक्षा करतो परंतु त्यासाठी त्यांना 7,000/- रुपये द्यावे लागतील असे त्यांनी सांगीतले आहे. मी त्यांना पैसे नाही दिले तर ते मला जास्त शिक्षा करतील म्हणुन मी त्यांना त्यावेळी होकार दिला होता.

त्यानंतर माझे विरुध्दचे चौकशी प्रकरणात माझ्या विभागाचे सक्षम प्राधिकारी श्री.क.बा.भारती, विभागीय वाहतुक अधिकारी, रा.प. नांदेड यांनी माझे विरुध्द अपराध क्रमांक 12/2023 मध्ये आरोपपत्र क्र. 582 दि. 11.04.2023 मध्ये मला दोषी ठरवुन त्यांचे कार्यालयाचे जा.क्र. राप/विनि/नांदे/वाह/ अपराध/25/820, रा.प. नांदेड दि. 16.04.2025 अन्वये मला 500/- रुपये दंडाची शिक्षा दिलेली आहे.

त्यानंतर दिनांक 30.04.2025 रोजी श्री. लक्ष्मीकांत जी.गवारे, कामगार अधिकारी यांनी मला बोलावुन विचारणा केली की, तुम्हाला सांगीतल्याप्रमाणे श्री. क. बा. भारती, विभागीय वाहतुक अधिकारी यांनी तुम्हाला फक्त 500/- रुपयांची शिक्षा केलेली आहे. आता ठरल्याप्रमाणे त्यांना द्यायचे 7,000/- रुपये आणुन द्या. त्यावर मी त्यांना म्हणालो की, सध्या एवढे पैसे माझेकडे नाहीत, माझी पगार झाल्यानंतर देतो असे त्यांना सांगीतले असता त्यांनी त्यास होकार दिला आहे अषा मजकूराची तक्रार दिली होती..

दिनांक 08/05/2025 रोजी सदर तक्रारीचे अनुषगांने श्री.गजानन बोडके, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेले दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य यांचा ऐकमेकांना परिचय करून दिला होता. त्यानंतर मी पंचाना माझी तोंडी तक्रार सांगितली. त्यानंतर पो.नि. श्री बोडके यांचेकडे मी दिनांक 02/05/2024 रोजी दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. पंचानी तक्रार वाचुन मी दिलेली लेखी तक्रार व तोंडी सांगितलेली तक्रार एकसारखीच असल्याची खात्री करून सदर तक्रारीवर दोन्ही पंचानी

सह्या केल्या. नमुद तक्रारीवर मी व पो.नि. बोडके साहेबांनी यापुर्वीच सही केली होती.

त्यानंतर पो.नि. श्री बोडके यांनी लाच मागणी पडताळणीचा उद्देश सांगुन मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यांचे सुचनेप्रमाणे पोकाँ खदिर यांनी पो.नि. श्री बोडके, माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर लाचमागणी पडताळणी कामी लोकसेवक गवारे कामगार अधिकारी राज्य परिवहन विभाग, नांदेड यांची त्यांचे विभागीय राज्य परिवहन कार्यालय, वर्कशॉप रोड नांदेड येथील कार्यालयात जावून समक्ष भेट घेवून लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरविले. पो.नि. श्री बोडके यांनी दोन्ही पंच, सापळा पथक व मला लाचमागणी पडताळणी कार्यवाही अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर वेळ 16.27 वा. सुमारास मी व पंच क्रमांक 1 शिवाजी सुर्यवंशी असे माझे मोटार सायकलने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नांदेड येथून व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे गळयात अटकावून देवून आम्हास लाचमागणी करीता विभागीय राज्य परिवहन विभाग, वर्कशॉप रोड नांदेड येथे रवाना केले होते.

त्यानंतर मी राज्य परिवहन विभाग, वर्कशॉप रोड नांदेड येथील कार्यालयात लोकसेवक गवारे यांची त्यांचे कक्षात भेट घेवून माझे विरूध्दच्या चौकशी संबधाने चर्चा केली असता त्यांनी मला म्हणाले की, आपले जे ठरल त्या प्रमाणे करा असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 7,000/- रूपये का ? असे म्हणालो असता त्यांनी तुम्ही 7,000/- रू द्या असे म्हणून माझेकडे लाच मागणी केली.

त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे मी व पंच क्रमांक 1 असे 17.37 वा. परत आलो. तेव्हा पोकाँ खदिर यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर घेवुन बंद केले. त्यानंतर पो.नि श्री बोडके यांनी मला व पंच क्रमांक 1 यांना लाचमागणी पडताळणी अनुषंगाने विचारपुस केली व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रित झालेले संभाषण पो.नि. श्री बोडके, दोन्ही पंच, सापळा पथक यांनी ऐकले. त्यात लोकसेवक गवारे यांनी माझे विरूध्दची चौकशी मध्ये शिक्षा कमी करून दिल्याचा मोबदला म्हणून विभागीय अधिकारी, श्री. क. बा. भारती, ने. राज्य परिवहन विभाग, नांदेड यांचेकरीता म्हणून 7000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले होते.

त्यानंतर दिनांक 14/05/2025 रोजी व दिनांक 15/05/2025 रोजी लोकसेवक क.बा. भारती विभागीय अधिकारी, राज्य परिवहन विभाग, नांदेड यांची लाचमागणी पडताळणी केली असता त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केली नाही.

दिनांक 08/05/2025 रोजी लोकसेवक गवारे यांनी त्यांचे अधिकारी श्री. क.बा. भारती यांचेकरीता माझेकडे 7,000/- रूपयाची लाचेची मागणी केलेली आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द दिनांक 16/05/2025 रोजी लाच स्वीकृती सापळा कार्यवाही करण्याचे निर्णय सर्वानुमते घेतला.

त्यानंतर पो.नि. श्री बोडके यांनी मला व दोन्ही पंचाना सापळा पुर्व कार्यवाहीचा उद्देश समजावून सांगितला. पो.नि श्री बोडके यांचे सुचनेवरुन पोहेकाँ वच्चेवार यांनी अँथ्रासिन पावडर चे गुणधर्म व अँल्ट्राव्हाईलेट टॉर्चची माहिती सांगुन त्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पो.नि. श्री बोडके यांनी सापळा कार्यवाहीचे अनुशंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवक गवारे यांनी माझेकडुन अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कोणता ईशारा करायचा ते सांगीतले. त्यानंतर माझी अंगझडती घेवून लोकसेवक गवारे यांना देण्यासाठी माझेकडील 7,000/- रूपये ज्यात 500 रू. दराच्या 14 चलनी नोटा घेवुन त्यास अँथ्रासिन पावडर लावुन माझे अंगात परिधान केलेल्या षर्टच्या समोरील डाव्या बाजुचे खिशात ठेवले.

पो.नि. श्री बोडके यांचे सुचनेवरुन पोकाँ खदिर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे गळयात दोरीच्या साहयाने लटकावुन दिले. त्यांनतर मी व पंच क्र. 01 सुर्यवंशी असे माझे मोटारसायकल ने ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथून वेळ 13.16 वा. रवाना झालो. आमचे पाठीमागे थोडे अंतर राखुन सापळा पथक मोटार सायकलने व

खाजगी वाहनाने आमच्या पाठीमागे आले.

मी व पंच क्र. 1 असे विभागीय राज्य परिवहन विभाग, नांदेड येथील लोकसेवक यांचे कक्षात गेलो. तेथे लोकसेवक गवारे हजर होते. तेव्हा आम्ही त्यांची भेट घेतली असता लोकसेवक गवारे म्हणाले की, काही अडचण आली की, मला सांगायचं, बसा इथ, असे बोलुन कक्षाचे बाहेर निघून गेले. ते परत न आल्याने मी व पंच क्रमांक 1 असे परत ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे परत आलो.

दिनांक 02/06/2025 रोजी सदर कार्यवाहीसाठी पंच सुर्यवंशी यांना पंच क्रमांक 2 व पंच शेख युनुस यांना पंच क्रमांक 1 म्हणून नियुक्त केले. त्यानंतर वेळ 16.01 मी व पंच क्रमांक 1 शेख युनूस असे ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथून लाचेची रक्कम 7,000/- रूपये व डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह लोकसेवक गवारे यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात गेलो असता त्यांची भेट झाली. समक्ष भेटी दरम्यान त्यांनी म्हणाले की, बोलतो तुला दोन ते तीन दिवसात असे म्हणून निघून गेले. त्यामुळे मी व पंच क्रमांक 1 शेख युनूस असे परत ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे परत आलो.

दिनांक 17/06/2025 रोजी वेळ 12.03 मी व पंच क्रमांक 1 शेख युनूस असे ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथून लाचेची रक्कम 7,000/- रूपये व डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह लोकसेवक गवारे यांचे कार्यालयात गेलो तेथे लोकसेवक गवारे साहेब हे कार्यालयात हजर नव्हते. त्यामुळे मी माझे मोबाईल नंबर 9665444110 वरून लोकसेवक गवारे यांचे मोबाईल नंबर 8007917666 वर फोनवर स्पीकर ऑन करून बोललो असता मी बाहेर आहे लावतो नंतर तुला असे म्हणून फोन बंद केला.

दिनांक 23/06/2025 रोजी लोकसेवक गवारे यांची सापळा कार्यवाहीसाठी भेट घेण्यासाठी पंच क्रमांक 1 शेख युनूस यांचेसह मोटार सायकलने लाचेची रक्कम व डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह वेळ 15.21 वा. विभागीय राज्य परिवहन विभाग, नांदेड येथे रवाना झालो. तेव्हा लोकसेवक गवारे हे त्यांचे कक्षात हजर होते. तेव्हा मी व पंच क्रमांक 1 असे दोघांनी नमुद ठिकाणी जावून त्यांची भेट घेतली असता त्यांनी म्हणाले की, आता काढून टाका डोक्यातुन विषय ते, असे बोलून त्यांनी माझेकडून लाचेची रक्कम स्वीकारली नाही. त्यामुळे मी व पंच क्रमांक 1 असे ला.प्र. वि. कार्यालय नांदेड येथे परत आलो. लोकसेवक गवारे माझेकडून लाच स्विकारण्याची षक्यता नाही.

तरी दिनांक 08/05/2025 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक गवारे यांचेषी माझे विरूध्दच्या चौकशी संबंधाने चर्चा केली असता आपले जे ठरल त्या प्रमाणे करा असे ते मला म्हणाले. त्यावर मी त्यांना 7,000/- रूपये का ? असे म्हणालो असता त्यांनी माझेकडे 7,000/- रूपयांची मागणी केली. लोकसेवक श्री लक्ष्मीकांत विठ्ठलराव गवारे, पद - कामगार अधिकारी, नेमणूक विभागीय राज्य परिवहन कार्यालय नांदेड यांनी माझे विरूध्दच्या चौकशी प्रकरणात शिक्षा कमी करून दिल्याचा मोबादला म्हणून त्यांनी श्री क.बा. भारती, पद - विभागीय वाहतुक अधिकारी, राज्य परिवहन विभाग, नांदेड यांचे पदाचा प्रभाव टाकून स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता माझेकडे 7,000/- रूपये लाचेची मागणी करून अनुचित लाभ मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून त्यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी यासाठी मी फिर्याद देत आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

पंच क्रमांक 1 सही

पंच क्रमांक 2 सही

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. **Action taken:** Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
SANTOSH BAPURAO TAMBE(I (Inspector)) / 15101000402SBTM82010

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): or (किंवा)

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे. भाग्यनगर नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANTOSH BAPURAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402SBTM820